# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,(दुसरा व चौथा मजला)
सर्व्हे नं. ८३२ -ए, फायनल प्लॉट क्रमांक १७८ व १७९ बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.

Phone No. - ०२०-२९७०९६१७/ २९७०९३९६ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in


जा.क्र. मरापप/बापवि/२०२६/ 1792
दिनांक: २८/०४/२०२६
28/4/2026

**प्रति,**
**गोपनीय प्रेस,**

**विषय :- महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) नोव्हेंबर - २०२५**
**प्रमाणपत्र वितरीत करणेबाबत...**
**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मरापप/बापवि/२०२६/७३७, दि. २३.०२.२०२६**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) **नोव्हेंबर - २०२५ दि. २३/११/२०२५** रोजी आयोजीत केली होती. सदर परक्षेच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या संदर्भियान्वये आपणास **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) नोव्हेंबर - २०२५** चे **पेपर १ व पेपर २** विहित. नमुन्यातील प्रमाणपत्र छपाई करणेबाबत आपणास अवगत करण्यात आले आहे.

तरी या पत्राद्वारे आपणास कळविण्यात येते की, सदर प्रमाणपत्र प्रस्तुत कार्यालयास पोहोच न करता परस्पर प्रत्येक जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरिक्षक (उ/प/द) यांना स्पीड पोस्टाद्वारे पाठविण्यात यावे सदरचे **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपर - १ व पेपर - २** असे वेगवेगळे गठ्ठे जिल्हानिहाय एकाच वेळी प्रत्येक जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरिक्षक (प/द/उ) यांच्या कार्यालयात पाठविण्यात यावे व त्याची पोहोच व अहवाल या कार्यालयास सादर करावी. **कोणत्याही परिस्थितीत परीक्षा परिषदेच्या परवानगी शिवाय महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपर - १ व पेपर - २ चे प्रमाणपत्र पुनश्च: संबंधित जिल्हा परिषदेस पाठवू नयेत.**

**सोबत:** जिल्ह्यानिहाय **पेपर - १ व पेपर - २** पात्र उमेदवारांची यादी सोबत जोडण्यात यावी.

**(महेश चोथे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४**

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,(दुसरा व चौथा मजला)
सर्व्हे नं. ८३२ -ए, फायनल प्लॉट क्रमांक १७८ व १७९ बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.

Phone No. - ०२०-२९७०९६१७/ २९७०९३९६ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in

जा.क्र .मरापप/बापवि/२०२६/ 1793
दिनांक:- २८/०४/२०२६
28/4/2026

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद (सर्व)

२) शिक्षण निरीक्षक, मुंबई
(पश्चिम,दक्षिण,उत्तर)

**विषय :- महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) नोव्हेंबर - २०२५ प्रमाणपत्र वितरीत करणेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) दि. २३/११/२०२५** रोजी आयोजीत केली होती. सदर परीक्षेचे प्रमाणपत्र वितरीत करावयाचे असल्याने परीक्षेस पात्र असणारे **पेपर - १ व पेपर - २** असे स्वतंत्र प्रमाणपत्राचे गोपनीय पाकिटे एकदाच आपणास गोपनीय प्रेस मार्फत प्राप्त होणार आहेत. **तद्नंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या वेळेस पोस्टाने प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यास त्याचे वाटप न करता तात्काळ परीक्षा परिषदेस अवगत करावे.**

तसेच सदर प्रमाणपत्रे प्राप्त होताच **गोपनीय संस्थेमार्फत व परीक्षा परिषदेमार्फत** प्राप्त झालेल्या सोबतच्या यादीनुसार खात्री करूनच **जिल्हानिहाय पात्र उमेदवारांची प्रमाणपत्रे वाटप करण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल** आपल्या स्तरावरून या **कार्यालयास सादर** करावा.

**सोबत :**

१. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा **(TET) - २०२५** पात्र उमेदवार **पेपर - १ व पेपर - २ च्या** साक्षांकित याद्या.
२. प्रमाणपत्र वितरण करणेबाबतच्या सूचना.
३. प्रमाणपत्र वितरण केल्याबाबतचा अहवाल नमुना. (सोबत उमेदवाराने प्रमाणपत्र घेऊन गेल्याबाबतची पोहच यादी जोडावी.

(महेश चोथे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४

Scanned with OKEN Scanner

## प्रमाणपत्राचे वितरण खालील सूचना प्रमाणे करावे.

१. **उमेदवारांनी खालील कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या प्रती घेऊन महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रमाणपत्र घेण्यासाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.**

**अ)** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेशपत्र प्रत.

**ब)** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा गुणपत्रिका प्रत.

**क)** डी.टी.एड उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र अथवा बी.एड. उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा गुणपत्रक

**ड)** आरक्षण प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र.

**इ)** दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र.

**फ)** माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा पुरावा.

**ग)** ओळखपत्र (आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्राइव्हिंग लाईसन्स, निवडणूक ओळखपत्र इ.)

२. प्रमाणपत्र वितरणाची पेपर निहाय नोंद वही ठेवावी. (त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी)

३. **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२५** परीक्षा **दि. २३/११/२०२५** चे पात्रता प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराला वितरित करताना प्रमाणपत्राच्या मागील पृष्ठावर संबंधित विद्यार्थ्याने शिक्षणाधिकारी (प्राथ.)/ शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे समक्ष स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानुसार स्वाक्षरी घेऊन व संबंधितांच्या प्रमाणपत्राची खात्री करुन शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी प्रमाणपत्र वितरीत करावे.

४. पात्र परीक्षार्थीना शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेमार्फत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेकडे लेखी तक्रार नोंदवावी. अर्जासोबत पुरावा दर्शक कागदपत्रे (गुणपत्रक, प्रमाणपत्र) जोडावेत. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी सदर तक्रारींचा शहनिशा करुन स्व: अभिप्रायासह सदर तक्रारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे त्वरीत पाठवाव्यात.

**(महेश चोथे)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

द्वारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ दुसरा व चौथा मजला सर्वे नंबर ८३२ ए, फायनल प्लॉट क्रमांक १७८ व १७९ बालचित्रवाणी जवळ आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा शिवाजीनगर पुणे ४११००४

Phone No- 020-29709617 Email - mscepune@gmail.com Website - www.mscepune.in


जा.क्र./मरापप/बापवि/२०२६/ १७९३.

दिनांक: ~~२८/०४/२०२६~~ २९/०४/२०२६

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सर्व,

२) शिक्षण निरिक्षक मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

**विषय:-** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२५ परीक्षेचे प्रमाणपत्र वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२५ मध्ये पात्र ठरलेल्या परीक्षार्थींची प्रमाणपत्रे वितरणासाठी सोबत पाठवित आहोत. संबंधित उमेदवाराचे शैक्षणिक, व्यावसायिक, जात वैधता प्रमाणपत्र, अंपगत्वाचे प्रमाणपत्र इत्यादी तपासून संबंधित उमेदवाराच्या कागदपत्रानुसार पात्र असल्यास प्रमाणपत्राचे वितरण करावे.

आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पेपर निहाय १५ दिवसांत खालील विहित नमुन्यात परीक्षा परिषदेस सादर करावा.

| **अ. क्र.** | **तपशील** | **प्राप्त प्रमाणपत्र संख्या** | **वितरीत केलेली प्रमाणपत्र संख्या** | **शिल्लक प्रमाणपत्र संख्या** |
|---|---|---|---|---|
| १ | पेपर क्र. १ प्रमाणपत्र | | | |
| २ | पेपर क्र. २ प्रमाणपत्र (गणित विज्ञान) / (सामाजिकशास्त्र) | | | |

उपरोक्त अहवाला सोबत प्रमाणपत्र वितरीत केलेबाबतची परीक्षार्थीनिहाय पोहोच यादी द्यावी.

**सोबत :** १) जिल्हा निहाय, पेपर निहाय उमेद्वार यादी.

२) पात्र उमेदवारांचे मूळ प्रमाणपत्रे.

**(महेश चौथे)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४.

**प्रत माहितीसाठी सविनय सादरः**

**१.. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई - 32**

**२. मा. आयुक्त (शिक्षण) शिक्षण, आयुक्तालय कार्यालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे - 01.**

**३. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक/उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - 01.**

**४. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - 01.**

**प्रत:**

**१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) माहिती व उचित कार्यवाहीस्तव.**

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे - ०४

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) - २०२५

## प्रसिध्दीपत्रक

**महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२५** परीक्षेचे आयोजन **दि. २३/११/२०२५** रोजी करण्यात आले होते. या परीक्षेतील पेपर क्र. I (इ. १ ली ते इ. ५ वी स्तर) व पेपर क्र. II (इ. ६ वी ते इ. ८ वी स्तर) चा अंतिम निकाल दि.०३/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात आलेला होता.

सदर परीक्षेत पात्र उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्र त्या - त्या जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद / शिक्षण निरीक्षक मुंबई (प/द/उ) यांचे कार्यालयाकडे देण्यात येत आहे.

तरी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (प/द/उ) यांचे कार्यालयात **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२५** पात्र उमेदवारांच्या प्रमाणपत्राचे वाटप **दिनांक १८/०५/२०२६ ते ०८/०६/२०२६** या कालावधीत केले जाणार आहे तरी पात्रता धारक उमेदवारांनी परीक्षा परिषदेच्या **www.mscepune.in** या वेबसाईट वरील सूचना वाचून आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह ज्या जिल्हयात परीक्षा दिली तेथील जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक मंबई (प/द/उ) यांचे कार्यालयाशी स्वतः संपर्क साधून आपले प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावेत.

ठिकाण : पुणे

दिनांक : १५ /०५/२०२६

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४**

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# प्रमाणपत्राचे वितरण खालील सूचना प्रमाणे करावे.

१. उमेदवारांनी खालील कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या प्रती घेऊन महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रमाणपत्र घेण्यासाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

अ) महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेशपत्र प्रत.

ब) महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा गुणपत्रिका प्रत.

क) डी.टी.एड. उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र अथवा बी.एड. उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा गुणपत्रक

ड) आरक्षण प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र.

इ) दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र.

फ) माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा पुरावा.

ग) ओळखपत्र (आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्राइव्हिंग लाईसन्स, निवडणूक ओळखपत्र इ.)

२. प्रमाणपत्र वितरणाची पेपर निहाय नोंद वही ठेवावी.

३. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा दि.२३/११/२०२५ चे पात्रता प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराला वितरित करताना प्रमाणपत्राच्या मागील पृष्ठावर संबंधित विद्यार्थ्याने शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे समक्ष स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानुसार स्वाक्षरी घेऊन व संबंधितांच्या प्रमाणपत्राची खात्री करुन शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी प्रमाणपत्र वितरीत करावे.

४. पात्र परीक्षार्थीना शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेमार्फत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेकडे लेखी तक्रार नोंदवावी. अर्जासोबत पुरावा दर्शक कागदपत्रे (गुणपत्रक, प्रमाणपत्र) जोडावेत. शिक्षणाधिकारी प्राथमिक/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी सदर तक्रारींचा शहनिशा करुन स्व: अभिप्रायासह सदर तक्रारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे त्वरीत पाठवाव्यात.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner